Presented on : 18-10-2022
Registered on : 18-10-2022
Decided on : 09-12-2022
Duration : 0 years, 1 months, 22 days

## आदेश निशाणी क्रं. 1 खाली

**1.** अर्जदाराने कलम 13(3) जन्म मृत्यु नोंदणी कायदया अंतर्गत प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. अर्जदार अरविंद गंगाराम सोनकांबळे यांच्या कथनाप्रमाणे त्यांचा मुलाचा नामे आदर्श पि. अरविंद सोनकांबळे याचा जन्म दिनांक 26.06.2017 रोजी मौ. सावरनागा (नि.) ता. कंधार जि. नांदेड येथे अर्जदाराच्या राहत्या घरी झालेला आहे. अर्जदाराच्या मुलाच्या जन्माची नोंद ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय सावरनागा (नि.) ता.कंधार जि. नांदेड येथे नियमाप्रमाणे एक वर्षाच्या आत झालेली नाही. अर्जदारास त्यांच्या मुलाच्या जन्माची नोंद शासकिय व शैक्षणिक कामकाजाकरिता जन्म नोंदणी प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

**2.** गैरअर्जदारास निशाणी क्रं. 05 प्रमाणे नोटीस हमदस्त देण्यात आली. गैरअर्जदाराने त्यावर कोणताही आक्षेप नोंदविला नाही. अर्जदाराच्या मुलाच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय सावरनागा (नि.) येथे उपलब्ध नसल्याचे सांगितले व जन्म नोंद अभिलेखात करण्याबाबत कोणताही आक्षेप घेतला नाही.

**3.** अर्जदार अरविंद गंगाराम सोनकांबळे यांनी स्वतःस निशाणी क्रं. 06 वर तपासले. अर्जदाराने साक्षीपुराव्याच्या शपथपत्रासोबत स्वतः चे आधारकार्डाची प्रमाणित प्रत नि.क्रं. 08 वर दाखल केली आहे. तसेच, अर्जदाराने ग्रामपंचायत कार्यालय सावरनागा (नि.) ता.कंधार जि. नांदेड द्वारे दिलेले जन्माच्या नोंदीचे अनुपलब्धता प्रमाणपत्र निशाणी क्र. 07 वर दाखल आहे. तसेच, वरील दाखल कागद पत्रानुसार ग्रामपंचायत कार्यालय सावरनागा (नि.) येथे अर्जदाराच्या मुलाच्या

जन्माची नोंद घेण्यात आलेली नाही. तसेच, निशाणी क्र. 12 वरील अर्जदाराने अंगणवाडी केंद्र सावरगाव ता. कंधार जि. नांदेड येथील अंगणवाडी रजिस्टर सन 2017 नुसार अर्जदाराच्या मुलाचा जन्म दिनांक 26.06.2017 असल्याचे प्रमाणपत्र अभिलेखावर दाखल केले आहे.

**4.** प्रस्तुतच्या अर्जामध्ये अर्जदाराने दाखल केलेल्या सर्व कागदपत्रांमध्ये अर्जदाराच्या मुलाच्या जन्माची तारीख 26.06.2017 असल्याचे निष्पन्न होते. म्हणुन मी खालील प्रमाणे आदेश पारित करित आहे.

**आ दे श**

1. अर्ज मंजुर करण्यात आला.
2. गैरअर्जदार यांनी अर्जदाराचा मुलगा नामे अरविंद पि. गंगाराम सोनकांबळे हयाचा जन्म दिनांक 26.06.2017 असल्याची नोंद कायदेशीर नियमाप्रमाणे व योग्य ती फीस आकारून करावी.
3. गैरअर्जदारास आदेशान्वये नोंद घेणे करीता पत्र पाठविण्यात यावे.

SAKHARE MANISHA BALAJI
Digitally signed by SAKHARE MANISHA BALAJI
Date: 2022.12.12 16:36:40 +0530

दिनांकः 09.12.2022
ठिकाणः कंधार

(श्रीमती म.बा. साखरे)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
(3रे न्यायालय),कंधार.

## ***CERTIFICATE***

I affirm that the contents of this P.D.F. file Order are same word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Junior Clark | : | P. G. Jamdade |
| Court Name | : | 3rd Jt. C.J.J.D. & J.M.F.C. Nanded. |
| Date | : | 09.12.2022 |
| Order signed by the Presiding Officer on | : | 09.12.2022 |
| Order uploaded on | : | 09.12.2022 |